REGISTERED No. B. 3434





# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलो धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ५ फेब्रुवारी १९४७ अंक ६

तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल
पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल।
याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्य कर्तव्य ठरतें. तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी
येथील सुप्रसिद्ध
कॉमनवेल्थ
विमा कंपनी लि.,
येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.
एजन्सीसाठी आजच लिहा अगर भेटा
ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष
एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**भारत इं. बँकेचा नफा**—भारत इंडस्ट्रियल बँकेचें ३१ डिसेंबर, १९४६ असेर संपलेंलें मांडवल ५५, लक्ष ४० हजार रु. झालें असून गेल्या वर्षाचा नफा ४८,५४६ रु. झाला आहे, असें समजतें. १९४५ सालांतील नफा १८,४०८ रु. होता.

**पेटंट प्रदर्शनाचें उद्घाटन**—लॉर्ड रे महाराष्ट्र इंडस्ट्रिअल म्युझियम, पुणें या संस्थेच्या विद्यमानें जमशेटजी टाटा दिनानिमित्त ३ मार्च ते ३१ मार्च १९४७ पेटंट प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी हिंदुस्थान सरकारचे कंट्रोलर ऑफ पेटंटस् श्री. रामा पै यांस आमंत्रण करण्यांत आलें आहे. श्री. रामा पै यांनीं आमंत्रणाचा स्वीकार केला आहे व प्रदर्शनाचें उद्घाटन त्यांचे हस्तें होईल.

**प्रो. काळे स्मारकनिधि**—प्रो. वा. गो. काळे स्मारक निधीच्या देणगीदारांची सभा ता. २७ जानेवारी रोजीं मुंबई येथें ना. वैकुंठराव मेहता ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. फंडाचे आतांपर्यंत ३२,००० रुपये जमले आहेत, ते गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकानॉमिक्सला देण्याचें ठरलें. यापुढील देणग्या परस्पर इन्स्टिट्यूटकडेच पाठविण्यांच्या आहेत. फंडाची रक्कम सरकारी रोख्यांत गुंतवून त्याच्या व्याजांतून, स्थापन व्हावयाच्या पुणें विश्वविद्यालयांत "हिंदी उद्योगधंद्यांचें अर्थशास्त्र" ह्या विषयाची एक लेक्चररशिप सुरू करण्यांत येईल. विश्वविद्यालय स्थापन होईपर्यंत, हें व्याज इन्स्टिट्यूटला दिलें जाईल व त्यांतून संशोधन शिष्यवृत्ति देण्यांत येईल.

# NOTICE.

### THE BANK OF MAHARASHTRA LIMITED

Notice is hereby given that the Twelfth Ordinary General Meeting of the Share-Holders of the Bank of Maharashtra Limited, will be held at the Registered Office of the Bank, Kakakuva Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday, the 23rd day of February 1947, at 4 P. M. (S. T.) to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account, and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1946.

*(2) To declare Dividend.

(3) To elect four Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By Order of the Board,
**C. V. JOAG,**
*Manager.*

Poona City,
26th January, 1947.

*N. B.*:—The Share Transfer Books of the Bank will be closed from the 14th day of February 1947, to the 28th day of February 1947, both days inclusive.

* The Dividend when declared, will be payable on and after 22nd March 1947, and the Dividend Warrants will be posted to the Registered Addresses of the Share-holders. Change of address if any, should immediately be communicated to the Bank.


—सुरवातीच्या—
अवघ्या ४ महिन्यांत कंपनीनें ५ लाखाचें वर काम मिळविलें.
**कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल**
**विमा कंपनी लिमिटेड, मुंबई**
या प्रगतिमान कंपनींत आपला विमा उतरून आपलें जीवन निर्वेध करा.
ठिकठिकाणीं अत्यंत सवलतीच्या अटीवर एजन्सीज व स्पेशल एजन्सीज देणें आहेत. खालील पत्त्यावर पत्र-व्यवहार करावा.
कृ. गो. परोपकारी
मॅनेजिंग डायरेक्टर
६५, सरस्वती विलास, लक्ष्मी रोड, पुणें २

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

लग्नसमारंभास व मेजवानीसाठीं
—रूपॉक्सचा—
शुद्ध साखरेचा केशरयुक्त
**:: सुधारस ::**
वापरा
बाटली किंमत २-८-०
घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.
मागविण्याचा पत्ता:—एम्पायर एजन्सीज,
१५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.

**शेअर्स विकणें आहेत:—**
गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.

# अर्थ

बुधवार, ता. ५ फेब्रुवारी १९४७

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.





प्रो. वा. गो. काळे

## सोव्हिएट रशिआंतील बँकिंगचे व्यवहार

कोणत्याही सुधारलेल्या देशांतील आर्थिक व्यवहार नियंत्रितपणें चालण्यासाठी बँकांची आवश्यकता असते. देशांतील अर्थव्यवस्थेला पायासारखी असणारी जी समाजरचना ती कोणत्याही स्वरूपाची असली तरी कर्जे व पतीचे व्यवहार करणाऱ्या बँकांसारख्या संस्थांची अवश्यकता असतेच असते. तथापि सोव्हिएट रशिआंत उत्पादन साधनांची खाजगी मालकी ज्याप्रमाणें नाहीं त्याचप्रमाणें खाजगी भांडवलाच्या बँकाही अर्थातच नाहींत हे लक्षांत ठेवलें पाहिजे. इतर देशांतून बँकांचा व्यवहार हा खाजगी मालकीच्या संस्थांना पोषक असाच मुख्यतः चालतो. तसा तो सोव्हिएट रशिआंत चालत नाहीं. रशिआखेरीज इतर देशांतील बँका दीर्घ व अल्प मुदतीची कर्जे व पतीचे आर्थिक व्यवहार करतात. रशियांत मात्र दीर्घ व अल्प मुदतीचे आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था वेगवेगळ्या आहेत. अल्प मुदतीचे बँकिंगचे व्यवहार करणारी मध्यवर्ती संस्था स्टेट बँक ऑफ यू. एस. एस. आर ही आहे. सध्यां रशियांत युद्धोत्तर पुनर्घटना नव्या जोमानें चालू असून तें कार्य मुख्यतः चार दीर्घ मुदतीची कर्जे देणाऱ्या बँकांकडून करण्यांत येत असते. त्या बँकांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत. (१) यू. एस. एस. आर. औद्योगिक बँक (२) शेतकी बँक (३) व्यापारी बँक आणि (४) मध्यवर्ती म्युनिसिपल बँक.

या बँकांचीं कार्यें काय असतात? औद्योगिक बँकेकडून उद्योगधंदे, वहातूक, पोष्ट व टेलेग्राफ, यांच्यासारख्या मोठ्या स्वरूपाच्या औद्योगिक वृद्धीला भांडवल पुरविण्यांत येतें. शेतकी बँकेकडे सामुदायिक व सहकारी शेती, त्याचप्रमाणें, शेतीचीं अवजारें, यांना लागणारा खेळता पैसा पुरविण्याचें सोपविलेलें आहे. व्यापारी बँक सहकारी व्यापारी संस्था आणि सहकारी उद्योगधंदे यांना भांडवलाचा पुरवठा करते आणि मध्यवर्ती म्युनिसिपल बँक स्थानिक म्युनिसिपल बँकांच्या साह्यानें घरें बांधणें, पाणीपुरवठा, दिवाबत्ती इत्यादि योजनांना जरूर तो पैसा पुरविते. या बँकांना लागणारा पैसा राष्ट्राच्या बजेटांतून पुरविण्यांत येतो. उदाहरणार्थ, सोव्हिएट रशियाच्या १९४६ ते ५० च्या पंचवार्षिक योजनेचा बँकिंगशी काय संबंध आहे ते आपण पाहू. नवीन उद्योगधंदे काढण्यासाठीं जेवढी तरतूद बजेटांत केलेली असते तेवढी रक्कम औद्योगिक बँकेकडें बजेटांतूनच दिली जाते. या बजेटाप्रमाणें भांडवल गुंतविलें जात आहे कीं नाहीं यावर या बँकेच नियंत्रण असतें. नवीन पंचवार्षिक योजनेपैकीं ७५ टक्के भांडवलाची गुंतवणूक या बँकेतर्फे होते. बजेटांतील सरकारी भांडवल पुरविण्याशिवाय, इतर संस्थांचेही पैसे या बँकेंतून ठेवी म्हणून घेतलें जातात व त्यावर ठराविक दरानें व्याजही दिलें जातें. सरकारनें व्याजाचे दर पुढील प्रमाणें ठरवून दिलेले आहेत. गिऱ्हाइकांच्या ठेवींवर १ ते १॥ टक्का व सहकारी शेती संस्थांच्या ठेवींवर ३॥ टक्के व्याज मिळते. गिऱ्हाईक या शब्दानें या ठिकाणी सार्वजनिक संस्था असा बोध घेतला पाहिजे. व्यक्तींच्या ठेवी या सेव्हिंग्ज बँकांतच स्वीकारल्या जातात. दीर्घ मुदतीच्या कर्जांवर १ टक्क्यापासून ६ टक्क्यापर्यंत व्याज आकारलें जातें. घरें बांधण्याच्या योजनांना १ टक्क्यानें कर्ज देण्यांत येतें. उलट, घेतलेलीं कर्जें मुदतींत न फेडलीं गेलीं तर शिक्षा म्हणून ६ टक्के व्याज, आकारण्यांत येतें. एखाद्या कारखान्यानें योजनेतील आपलें उत्पादन ठराविक मुदतीत पार पाडले नाही तर त्या कारखान्याला पतीवर पैसे देण्याचें नाकारण्याचा बँकांना हक्क असतो. औद्योगिक बँकेप्रमाणेंच इतर तीनही बँकांचे व्यवहार चालतात व त्यांना लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा मुख्यतः सरकारी बजेटांतून करण्यांत येतो.

सोव्हिएट पद्धतीच्या अर्थव्यवस्थेंत बँकांचा उपयोग उत्पादन सुसूत्र चालण्यासाठी करण्यांत येतो. उलट, भांडवलदारी समाजांत उत्पादन व त्याचा विनिमय यांत होणाऱ्या तेजीमंदीमुळें बँकांचेंही व्यवहार कमी–अधिक तेजीमंदीचे होत असतात, ही गोष्ट सर्वांत महत्वाची आहे. सोव्हिएट रशिआंत बँका या साधन. म्हणून वापरल्या जातात, साध्य म्हणून नाहीं.

## प्रो. बानर्जी ह्यांचें मार्मिक भाषण–घटना परिषदेला सूचना.

सध्यां हिंदुस्थानच्या राजकारणांत घटना परिषदेच्या कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. अशा वेळीं घटना परिषदेच्या कार्याला मार्गदर्शक होतील असे मार्मिक विचार डाक्का विद्यापीठाचे राजनीतिशास्त्राचे प्रमुख, प्रोफेसर बानर्जी ह्यांनीं नुकत्याच दिल्ली येथें भरलेल्या राजनीति शास्त्रज्ञांच्या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत प्रगट केले. प्रो. बानर्जी ह्यांनीं असें सांगितलें कीं स्वयंनिर्णयाचें तत्त्व हें फक्त भौगोलिक, आर्थिक व संरक्षणाच्या दृष्टीनें अखंड असलेल्या देशाचे बाबतींत लावता येतें. एखाद्या, वरील कसोटीस न उतरणाऱ्या जमातीला, हें तत्त्व केव्हांहि लावता येणार नाहीं. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचे पुरस्कर्ते प्रेसिडेंट विल्सन ह्यांचेंहि मत असेंच होतें. राष्ट्रसंघाच्या इतिहासांतून ह्या मताला पोषक असा एक दाखला प्रो. बानर्जी ह्यांनीं दिला. आर्थिक दृष्ट्या पाकिस्तान अशक्य आहे.

### मध्यवर्ती सरकारची घटना प्रथम बनवा

घटना परिषदेनें मध्यवर्ती सरकारची किंवा इंडियन यूनियनची घटना आधीं तयार केली पाहिजे. नंतरच 'गट' व 'प्रांत' यांची घटना करणें सोईस्कर होईल. परराष्ट्रीय संबंध, संरक्षण व वाहतूक हीं तीनच खातीं यूनियन सरकारकडे असलीं तरी ह्या तीन खात्यांचा खर्च चालण्यासाठीं जरूर ते कर बसविण्याची सत्ता यूनिअन सरकारला देण्यांत आली आहे. यामुळें यूनियन सरकारचा संबंध प्राप्तीवरील कर, उत्पादनावरील कर, जकाती इ. महत्त्वाच्या करांच्या बाबींशीं येईलच, व त्याशिवाय चलनाची व्यवस्था, रिझर्व्ह बँक, पोस्ट व तार खातें, अंतर्गत नद्यांतील दळणवळण इ. अनेक खात्यांशींही कोणत्या तरी प्रकारें येईलच. एकट्या संरक्षण खात्यावरच शांततेच्या काळांत मध्यवर्ती सरकारचा निम्मेहून जास्त खर्च होतो यावरून ह्या गोष्टीचें महत्त्व लक्षांत येईल. सारांश, हिंदुस्थानच्या आर्थिक जीवनांतील अनेक महत्त्वाच्या बाबींचा यूनियन सरकारच्या खर्चांशीं निकटचा संबंध येईल.

### 'संरक्षण' शब्दाचा अर्थ व्यापक करा

प्रो. बानर्जी यांच्या भाषणांतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'संरक्षण' ह्या शब्दाचा शक्य तितका व्यापक अर्थ केला पाहिजे हा होय. 'संरक्षण' म्हणजे केवळ परराष्ट्रापासून संरक्षण नव्हे, तर कोणत्याहि तऱ्हेची अंतस्थ बंडाळी किंवा अनावस्था किंवा जातीय कलह यापासूनहि संरक्षण करण्याचा पूर्ण हक्क यूनियन सरकारकडे राहिला पाहिजे. विशेषतः बंगाल व बिहार येथील अलिकडची परिस्थिति लक्षांत घेतां, 'संरक्षण' शब्दाचा असा व्यापक अर्थ करणें अत्यंत आवश्यक आहे असें प्रो. बानर्जी ह्यांनीं बजाविलें. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ अमेरिकन राज्यघटनेचा दाखला त्यांनीं दिला. संरक्षण खात्याचें क्षेत्र विस्तृत झालें तरच मध्यवर्ती सरकार कार्यक्षम होईल.

ह्याप्रमाणें प्रो. बानर्जी ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत घटना-परिषदेला योग्य तऱ्हेचें मार्गदर्शन केलें आहे. यूनियन सरकारचा व्याप आर्थिक दृष्ट्या कसा व्यापक केला पाहिजे हें त्यांनीं उत्तम रीतीनें दाखविलें.

# स्फुट विचार

## हिंदी येण्याच्या वसुलीसंबंधीं वाटाघाटी

हिंदुस्थानचें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें साठून राहिलें आहे, त्या संबंधीं हिंदुस्थान सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठीं ब्रिटिश शिष्टमंडळ येथें येऊन दाखल झालें आहे. चर्चेस प्रारंभ झाला असून, ती संपण्यास दोन आठवडे तरी लागतील, अशी अपेक्षा आहे. इजिप्त आणि इराक ह्या देशांचें येणेंहि ग्रेट ब्रिटनमध्यें अडकून पडलें आहे. त्या देशांच्या सरकारांशींहि वाटाघाटी करण्यासाठीं हिंदुस्थानांतील काम आटपल्यावर, ब्रिटिश शिष्टमंडळ तिकडे जाणार आहे. एकूण सुमारें १,६०० कोटि रुपयांच्या येण्याची सबंद वसुली एकदम करतां येईल, असें कोणासच वाटत नाहीं. निम्मी रकम ब्रिटिश सरकारनें १९५० पूर्वीं परत करावी आणि बाकीच्या रकमेचें दीर्घकालीन कर्जांत रूपांतर करावें, ह्या कल्पनेवरच हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी बोलणी करतील, असें समजतें. येत्या चार वर्षांत परत फेडण्याच्या रकमेची वाटणी सुचविण्यांत येत आहे, ती अशीः— २५० कोटि रु. रिझर्व बँकेचा चलननिधि म्हणून बाजूस काढून ठेवावे. २५० कोटि रुपयांचा विनियोग यंत्रसामुग्री वगैरेच्या खरेदीसाठीं करावा. हिंदुस्थानांत ब्रिटिशांचे व्यापारी हक्क व मालमत्ता आहे, त्यांच्या खरेदीसाठीं २५० कोटि रुपयांचें येणें उपयोगांत आणावें आणि ६० कोटि रुपये युद्धोपयोगी मालाच्या खरेदीबद्दल वळते करावे. शेवटच्या दोन वर्षांस ज्यास्त रकम लागली, तर त्यासाठीं ४० कोटि रुपये राखून ठेवावे. ७५० कोटि रुपये येण्याचें दीर्घकालीन कर्जांत रूपांतर केलें जाईल, त्यापैकीं ७५ कोटि रुपये ग्रेटब्रिटननें १९५० नंतर दरसाल फेडत जावे, आणि १९४७ ते १९६० अखेर २% व्याज भरावें. व्याजाची रकम १२७½ कोटि भरेल ती १० वर्षांवर वाटून दिली म्हणजे सालिना १२¾ कोटि रुपये व्याज असा हिशेब होतो. ग्रेटब्रिटन कर्जाची फेड करणार, ती सोन्याच्या किंवा चलनी नोटांच्या स्वरूपांत नसून मालाचे स्वरूपांतच करणार, हें उघड आहे. दरसाल सुमारें ८७½ कोटि रुपयांची यंत्रसामुग्री हिंदुस्थान घेऊं शकेल किंवा नाहीं, हा प्रश्न येथें उपस्थित होतो. दरसाल एवढ्या किंमतीचा माल पत्करूनच हिंदी येण्याची फेड होणार आहे.

---

## मुंबई प्रांताचा गहूं पुरवठा

मुंबई सरकारच्या प्रसिद्धी—खात्यातर्फे प्रांतांतील गव्हाच्या पुरवठ्याविषयीं एक पत्रक काढण्यांत आलें आहे. सदर पत्रकांत मार्च १९४७ पर्यंत तरी प्रांतांतील गव्हाच्या पुरवठ्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं, असं जाहीर करण्यांत आलें आहे. या तुटीचें कारण म्हणून नोव्हेंबर व डिसेंबर १९४६ मध्यें अपेक्षेपेक्षां कमी गहूं हिंदुस्थानांत आयात झाला असें सांगण्यांत येत आहे. आयात कमी झाली असली तरी प्रांतांतील गव्हाच्या पिकांत कांहीं वाढ झाली कीं नाहीं हें मात्र पत्रकांत नमूद करण्यांत आलेलें नाहीं. सरकारनें अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला जें उत्तेजन दिलें त्याचा परिणाम काय झाला हें लोकांना कळणें अत्यंत आवश्यक आहे. जानेवारी १९४७ च्या प्रारंभीं सरकारजवळ २ लाख, २३ हजार, ६०० टन धान्याचा सांठा होता. त्यापैकीं ५० हजार टन बाजरी आणि मका हें धान्य होतें. १९४६ च्या आरंभीं धान्याचा सांठा २ लाख, ६६ हजार टन होता असेंही पत्रकांत जाहीर करण्यांत आलें आहे. म्हणजे चालू वर्षाच्या आरंभीचा सांठा गेल्या वर्षाच्या आरंभीच्या साठ्यापेक्षां कमी आहे. हा साठा या वर्षी कमी होण्याच्या कारणांचा खुलासा पत्रकांत करण्यांत आलेला नाहीं. सरकारी सक्तीच्या धान्य-वसुलीच्या योजनेची कसून अंमलबजावणी होत नाहीं हें याचें कारण आहे किंवा काय अशी शंका येणें साहजिक आहे. नोव्हेंबर व डिसेंबर १९४६ मध्यें सरकारनें ७४,९०० टन धान्य प्रांतात खरेदी केलें. गेल्या वर्षी म्हणजे १९४५ सालच्या याच महिन्यांत धान्य खरेदीचा आंकडा ७८,५०० टन होता असें पत्रकांतच सांगितलें आहे. तेव्हां केवळ तौलनिक आकड्यावरूनच निष्कर्ष काढावयाचा झाल्यास तो वरीलप्रमाणें काढण्यास अवसर आहे. धान्याचा तुटवडा आहे तोपर्यंत शिधा पद्धति चालू ठेवणें अपरिहार्यच आहे आणि शिधापद्धति चालू ठेवण्यासाठीं सक्तीची धान्य खरेदीही चालू ठेवावीच लागणार; म्हणून सक्तीची धान्य खरेदी अधिक कसोशीनें करणें व तशी ती होत असल्याची ग्वाही जनतेस देणें सरकारचें कर्तव्य आहे.

---

## हिंदी खनिज संपत्ति व तज्ज्ञ

हिंदुस्थानांतील खनिज संपत्तीचें संशोधन अद्याप बाल्यावस्थेंत आहे. कोणत्याही उद्योगप्रधान देशाला खनिज संपत्ति व तिचा उपयोग याविषयीं उदासीन राहून चालणार नाहीं. हिंदुस्थानचें औद्योगिकरण ब्रिटिश राजकीय वर्चस्वामुळें रेंगाळल्यामुळें खनिज संपत्तीचें संशोधन तर झालें नाहींच, पण असलेल्या संपत्तीचाही उधळेपणानें व्यय होऊं लागला. हिंदुस्थान या संपत्तीच्या बाबतींत कितपत सुदैवी आहे याचा अंदाज अजून लागलेला नाहीं आणि म्हणूनच ज्ञात संपत्तीचा उपयोग योग्य मार्गानें करणें अगत्याचें होऊन बसलें आहे. हिंदुस्थानचे खाणी—खनिज खात्याचे मंत्रि श्री. भाभा यांनीं कलकत्ता येथें या विषयासंबंधीं बोलतांना दोन सूत्रें पुढें मांडलीं. पहिलें असें कीं हिंदुस्थानच्या ज्ञात खनिज—संपत्तीचा अधिकांत अधिक उपयोग करून घेतला पाहिजे. दुसरें सूत्र असें कीं हिंदी विद्यापीठांतून या विषयाचे तज्ज्ञ अधिक प्रमाणांत तयार झाले पाहिजेत. या दोन्ही तत्त्वासंबंधीं दुमत होण्याचें कारण नाहीं परंतु तपशिलांत शिरू लागलों, म्हणजे मतभेदांना प्रारंभ झाल्याखेरिज रहाणार नाहीं. उदाहरणार्थ, कोळशाचा अधिकांत अधिक उपयोग करून घ्यावयाचा म्हणजे कसा? हिंदुस्थानांतील कोळशाचा सांठा इंग्लंड-रशिया-अमेरिकेप्रमाणें अवाढव्य नाहीं. तेव्हां त्याचा उपयोग काटकसरीनें केला गेला पाहिजे. गिरण्या, कारखाने, रेल्वे, इत्यादिकांना लागणाऱ्या कोळशाच्या ऐवजीं विजेची शक्ती पुरवितां आली तर तें देशाचें फायद्याचें होईल. परंतु त्यासाठीं वीज पुरवठ्याचीं धरणें व विजेच्या उपकरणांच्या कारखान्यांची उभारणी करावी लागेल. ज्या प्रांतांतून अशीं धरणें बांधणें नैसर्गिक दृष्ट्या शक्य नाहीं, तेथल्या रेल्वेना व कारखान्यांना औद्योगिक शक्तीचा पुरवठा कसा करावा असा प्रश्न उभा राहील. हल्ली चाललेली प्रांतिक स्पर्धा पाहतां मध्यवर्ती सरकारला या बाबतींत सर्वाधिकार असल्यांशिवाय असले प्रश्न सुटणें शक्य दिसत नाहीं. तज्ज्ञांच्या अभावाची उणीव परदेशांतून तज्ज्ञ आयात करून तूर्त भागविली तरी, त्या तज्ज्ञांकडून एतद्देशीय तज्ज्ञ तयार करण्यानेंच हा प्रश्न कायमचा सुटेल.

---

## नवीन भांडवल उभारणीस परवानगी—कांहीं कंपन्या

( २१–१–४७ ते २७–१–४७ )

| कंपनी | कंपनीचें काम | भांडवल रक्कम ( रु. ) |
|---|---|---|
| शॉ वॅलेस अँड कं. लि., मुंबई | व्यापार, मॅनेजिंग एजंट्स इ.—खासगी कंपनीचें पब्लिक कंपनींत रूपांतर | १,५०,००,००० |
| पाइनवुड हॅटेल लि., कलकत्ता | पाइनवुड हॉटेल, शिलाँग विकत घेऊन चालविणें. नवीन कंपनी | ८,००,००० |
| एच. जे. फॉस्टर अँड कं. लि., मुंबई | ग्लॅक्सो इ. उत्पादन करणें—चालू कंपनीची भांडवल वाढ | १,९०,५०,००० |
| जे. के. केमिकल्स लि. मुंबई | केमिकल्सचें उत्पादन—नवी कंपनी | १,००,००,००० |
| चौबे टेक्स्टाइल लूम मॅ. कं. लि., मुंबई | लूम्स तयार करणारी नवी कंपनी | ५०,००,००० |

एकूण १७ कंपन्यांना ९,२२,७०,००० रुपयांचें नवें भांडवल उभारण्यास परवानगी देण्यांत आली.

# महाराष्ट्रीय बँकांच्या प्रगतीचें स्वरूप

महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक बँकिंगचा व्यवसाय आतां दृढमूल झाला आहे. ह्या व्यवसायाचा महाराष्ट्रांतील मागचा अनुभव विशेष उत्साहकारक नसतांनाहि, महाराष्ट्रीय बँकांनीं जनतेचा विश्वास संपादन करून आतां चांगली प्रगति केली आहे. धडाडीचा अभाव, हें महाराष्ट्रीयांत मोठें वैगुण्य आहे असें नेहमीं सांगण्यांत येतें. बँकिंगच्या व्यवसायापुरता विचार केला, तर धडाडीचा हा अभाव अखेर गुणच ठरतो, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. कै. मो. वा. गो. काळे ह्यांचे महाराष्ट्र बँकेंतील चित्र अनावरण करतेवेळीं, मुंबई प्रांताचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं आपल्या भाषणांत, बँकिंगच्या व्यवहारांत भलत्या धडाडीस स्थान कसें नाहीं, हें नुकतेंच विशद केलें. त्या संबंधांत त्यांनीं बँक ऑफ इंडिया लि. चें उदाहरण देऊन, त्या बँकेच्या धोरणाचा आदर्श अप्रत्यक्ष रीतीनें महाराष्ट्रीय बँकांपुढें ठेवला. महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक बँकांनीं गेल्या दहा वर्षांत जनतेचा विश्वास कायम राहण्याच्या दृष्टीनेंच आपलें धोरण सामान्यतः आखलेलें आहे; कारण ठेवीदारांचा बँकेवरील अंतिम विश्वास हेंच तिचें अखेर खरें भांडवल असतें. हें सावधगिरीचें धोरण, भित्रेपणाचा कमीपणा स्वीकारूनहि, महाराष्ट्र बँकेनें अंगीकारलें आणि त्यामुळें महाराष्ट्रीय बँकांवरील विश्वास वाढण्यास मोठेंच सहाय होऊन अखेर त्याचा परिणाम महाराष्ट्रीय बँकांची सत्वर प्रगति होण्यामध्येंच झाला. आपल्या बँका आतां प्रारंभीच्या अनिश्चितपणाच्या वातावरणांतून बाहेर पडल्या आहेत. युद्धकालानें त्यांचे व्यवहार वाढविण्यास चांगलें सहाय केलें आणि त्यांच्या नफ्याची रक्कमहि वाढत गेली. ह्या परिस्थितीचा योग्य उपयोग बँकांनीं आपली मजबुती वाढविण्याकडे कसा केला आणि त्या युद्धोत्तर परिस्थितींत आपलें स्थान टिकविण्यास कशा समर्थ होत आहेत, त्याची कल्पना देणारे तुलनात्मक आकडे आम्हीं देण्याचें योजिलें आहे, आणि महाराष्ट्र बँकेपासून त्यास प्रारंभ करीत आहों. इतर बँकांच्या प्रगतीची अशीच तुलनात्मक-माहिती त्यानंतर प्रसिद्ध होईल. सालोसालच्या तुलनात्मक आकड्यांचा साकल्यानें विचार करण्यास प्रस्तुत समय सोईस्कर असल्यानें, वाचकांत ह्या उपक्रम उद्‌बोधक वाटेल, असा भरंवसा आहे.

### बँक ऑफ महाराष्ट्र लि.

१६ सप्टेंबर १९३५—बँकेची स्थापना.

सन १९३७—बँकेचें दुसरें वर्षीच दरसाल दर शेकडा ३¾% टक्के प्रमाणें टॅक्स फ्री डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

सन १९३८—प्राथमिक स्वरूपी सर्व खर्च लिहून टाकण्यांत ( राइट ऑफ ) येऊन मुंबई येथें पहिली शाखा उघडण्यांत आली.

सन १९४०—डेक्कन जिमखाना पुणें ४ येथें स्थानिक शाखा उघडण्यांत आली.

सन १९४२—बँकेचे प्रथमपासून असलेले मॅनेजर, मि. एम्. व्ही. गोखले सेवानिवृत्त झाले.

सन १९४३—जळगांव ( पूर्व खानदेश ) व नागपूर येथें दोन नवीन शाखा काढण्यांत आल्या. बँकेनें स्वतःचे इमारतीसाठीं पुणें शहराचे मध्यभागीं "विश्राम बाग" वाड्यासमोर १ लक्ष, ५ हजार रुपयांस जागा खरेदी केली.

सन १९४४—बँकेनें ५ रुपये वाढाव्यानें काढलेले सर्व शेअर्स खपले जाऊन, वाढाव्याची सर्व रक्कम रु. १,३२,९९५ गंगाजळींत टाकण्यांत आली. बँकेनें "शेड्युल्ड" होण्याचा मान पटकाविला. गिरगांव ( मुंबई ) व खडकी येथें दोन नवीन शाखा उघडण्यांत आल्या.

सन १९४५—रत्नागिरी व कोपरगांव येथें शाखा व फैजपूर ( पूर्व खानदेश ) येथें "पे ऑफिस" उघडण्यांत आली. बँकेनें एक्झिक्युटर व ट्रस्टीचें काम करणेकरितां स्वतःची सबसिडिअरी कंपनी काढणेचें ठरविलें.

सन १९४६—धुळें, सोलापूर, चाळिसगांव, नाशिक, हुबळी, कल्याण व इतवारी ( नागपूर ) येथें नवीन शाखा उघडण्यांत आल्या.

### महाराष्ट्र बँकेच्या तुलनात्मक प्रगतीचा तक्ता

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निवळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर (% करमाफ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ( रु. ) | ( रु. ) | ( रु. ) | ( रु. ) | ( रु. ) | ( रु. ) | ( रु. ) | |
| १९३६ | १,०४,००० | १३० | ७,२०,००० | ८,२६,००० | ११,७०० | ६०० | ... | ... |
| १९३७ | १,१२,००० | ७,०१५ | १२,१२,००० | १३,३९,००० | २८,६०० | १३,७०० | ३,७०० | ३¾ |
| १९३८ | १,२५,००० | १६,००० | १७,०४,००० | १८,५५,००० | ३५,४०० | १७,५०० | ४,१०० | ३¾ |
| १९३९ | १,५१,००० | २९,००० | २०,८३,००० | २३,१३,००० | ४२,१०० | १९,२०० | ४,९०० | ३¾ |
| १९४० | १,८१,००० | ४१,१०० | २७,५२,००० | ३०,३९,००० | ५०,६०० | २०,३०० | ६,५०० | ४ |
| १९४१ | २,०९,००० | ५०,२०० | ३३,६२,००० | ३७,३१,००० | ६१,८०० | २०,४०० | ७,७०० | ४ |
| १९४२ | २,९०,००० | ५०,२०० | ४४,४६,००० | ४८,४३,००० | ७७,००० | २८,००० | १०,२०० | ४½ |
| १९४३ | ३,४०,००० | ६१,००० | ६६,९१,००० | ७३,००,००० | ९६,००० | ३६,००० | १४,९०० | ४½ |
| १९४४ | ७,५७,००० | २,०८,००० | ९२,२३,००० | १,०७,६१,००० | १,८५,७०० | ८६,७०० | २३,६०० | ४½ व ½ बोनस |
| १९४५ | १२,५०,००० | २,७०,००० | १,२९,७५,००० | १,५५,९०,००० | ३,०४,००० | १,७०,००० | ५१,४०० | ५ |
| १९४६ | १२,५०,००० | ३,००,००० | १,८१,५६,००० | २,०७,३०,००० | ३,९५,००० | १,९२,६०० | ६२,५०० | ५ |

**बँकरचा अनपेक्षित मृत्यु**—बार्क्लेज बँक ह्या बड्या ब्रिटिश बँकेचे चेअरमन मि. एडविन फिशर, हे इंग्रजांच्या राणीस तिच्या खासगी पैशाच्या व्यवहारासंबंधीं सल्ला देण्याकरितां राजवाड्यांत गेले होते. बोलणें चालू असतांनाच ते आजारी पडले आणि ॲम्ब्युलन्स गाडींतून त्यांना इस्पितळांत पोचवावें लागलें, परंतु थोड्याच तासांत ते मरण पावले.

**धारवाड येथील शेतकी कॉलेज**—धारवाड येथील सरकारी शेतकी कॉलेजाला येत्या मेमध्यें प्रारंभ होईल. रावसाहेब एच. एम. देसाई ह्यांस कॉलेजचे प्रिन्सिपॉल नेमण्यांत आलें आहे.

**पेट्रोल कर**—मद्रास सरकारनें पेट्रोलवरील विक्रीकर गॅलनला दीड आण्यांचा चार आणे केला आहे.

**तुंगभद्रा नदीचें धरण तयार होण्यापूर्वीच**—तुंगभद्रा नदीच्या धरणाची योजना मद्रास सरकारनें हातीं घेतली आहे. त्या धरणाचें पाणी ज्या जमिनींस मिळणार आहे, त्या जमिनींची खरेदी मोठ्या प्रमाणावर होऊं लागली आहे. जमिनीच्या बाबत हे सोडतीच्या स्वरूपाचे व्यवहार टाळण्यासाठीं मद्रास सरकार कायदेशीर उपाययोजना करीत आहे.

**रशियन भाषेचा अभ्यास**—ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांना रशियन भाषा शिकविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. "जितके ज्यास्त जनरल रशियन भाषा शिकतील, तितकें उत्तम" असें फील्ड मार्शल व्हायकौंट मॉंटगॉमरी हे नुकतेच म्हणाले.

## लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें

### संग्रहालय संस्थेचें संगोपन व संवर्धन

(लेखकः—श्री. मा. वि. घारपुरे, क्युरेटर, लॉर्ड रे म. औ. संग्रहालय, पुणें)

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें या संस्थेसाठी स्वतंत्र कायदा लवकरच होणार आहे. त्याचा आद्य हेतु संग्रहालय संस्थेचें स्थैर्य, संगोपन व संवर्धन हा आहे. या कायद्यांत हेतु हें कलम व्यापक व मूलगामी आहे. आजपर्यंत झालेल्या कोणत्याहि कायद्यांत तें इतकें व्यापक स्वरूपांत मांडलेलें नाहीं. या कायद्यानें या संस्थेस चिरस्थायित्व प्राप्त होईल. या कायद्याची प्रस्तावना कै. प्रो. वा. गो. काळे यांनीं प्रथम लोकल सेल्फ–गव्हर्नमेंट कमिटीच्या रिपोर्टामध्यें सुमारें १० वर्षांचे पूर्वी केली व त्या सूचनेस सरकारनें मान्यता दिली. या सूचनेंत मुंबई प्रांतांत तीन विभागांत तीन संग्रहालयें स्थापन करण्यांत यावीत व त्यांचेसाठी स्वतंत्र कायदा व्हावा असेंहि सुचविलें होतें. मोठमोठ्या शहरीं संग्रहालयें स्थापन व्हावींत ही गोष्ट कमिटीस मान्य होती परंतु सांपत्तिक स्थिति लक्षांत घेऊन सर्व मोठ्या म्युनिसिपॅलिट्यांचें, संग्रहालयें हें अवश्य कर्तव्य करण्यास कमिटीनें अनुकूलता दिली नाहीं. प्रो. काळे म्हणत कीं, पुण्याचें संग्रहालय न्यायमूर्ति रानडे यांनीं स्थापन केलें आहे. त्याचेबद्दल मला मोठा आदर व अभिमान आहे. व या संस्थेच्या संवर्धनासाठीं मला जें जें कांहीं करतां येणें शक्य असेल तें तें मी करीन. व त्यांच्या आश्वासनांतूनच या आजच्या कायद्याचा जन्म झाला आहे. या कायद्यानें पुणें शहर म्युनीसिपॅलिटीपुरतें तरी "संग्रहालयें" हें अवश्य कर्तव्य निरंतरच्या देणगीच्या रूपानें झालेलें आहे. या संस्थेच्या विश्वस्त समितीवर शिक्षण, उद्योगधंदे, शेतकी, जंगल, सहकारी खातें, स्थापत्य यांचे सरकारी खात्यांचे प्रतिनिधि नियोजित केलेले आहेत व त्यामुळें ही संस्था हा खरा औद्योगिक संग्रहालय झाला आहे. या संस्थेनें सन १९३२ सालींच स्वतंत्र कायद्याची मागणी केली होती. या मागणीस मागील काँग्रेस सरकारनें मान्यता दिली होती व तदनुरोधानेंच हा कायदा होत आहे.


अधिकारसंपन्न बोर्ड, व्यापक धोरण, सरकारची अनुकूलता व अशा संस्थांची आजच्या काळांत असलेली अत्यंत जरूरी यांचे साकल्यपूर्ण साहचर्यानें या संस्थेचा उदयकाळ समीप आहे व हा कायदा व या संस्थेचें कार्य अशीं संग्रहालयें अन्यत्र स्थापन होण्यासही मार्गदर्शक होणार आहेत. ह्या कायद्याचा मसुदा लवकरच सर्वमान्य होऊन त्याचें नियंत्रणानें या संस्थेचा कारभार सुरू होणार आहे, हें या संस्थेच्या उत्कर्षाचें द्योतक व मोठें सुचिन्हच आहे.

## दि सावंतवाडी स्टेट बँक, सावंतवाडी

### गॅरंटी खालीं चाललेली, बिगर शेअर भांडवलाची संस्था.

वरील बँकेकडे ६० लक्ष, ३५ हजारांच्या ठेवी असून तिचा रिझर्व्ह फंड ८८ हजारांचा आहे. इन्व्हेस्टमेंट फ्ल. फंडांत ४३ हजार रुपये, बॅड डेट रिझर्व्ह फंडांत १२ हजार रुपये, बिल्डिंग फंडांत १० हजार रुपये व कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह फंडांत १½ हजार रुपये आहेत. बँकेनें एकूण १४ लक्ष, ८५ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत, त्यापैकी ८ लक्ष, ९९ हजार रुपये दरबारला धान्य खरेदीसाठीं दिलेले आहेत, सरकारी व इतर रोख्यांत ४१ लक्ष, १६ हजार रुपये असून त्यांची बजारी किंमत ठालेबंदी किंमतीपेक्षा १ लक्ष ३ हजारांनीं अधिक आहे. बँकेकडील ठेवींपैकी फक्त ११ लक्ष, ७१ हजारांच्या ठेवी चालू खात्याखालील आहेत, त्या दृष्टीनें बँकेच्या पैशाचा तरलेपणा अधिकच स्पष्ट होतो. बँक ही लिमिटेड कंपनी नसून सावंतवाडी दरबारच्या गॅरंटीनें, ठेवींतून निर्माण होणाऱ्या फंडावर ती चालते. ३१–७–१९४६ अखेरच्या वर्षाचा ६१, ५१६ रुपयांचा सबंद नफा त्यामुळें रिझर्व्ह व इतर फंड वाढविण्यास सहायकारक झाला आहे. डिव्हिडंडचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. सावंतवाडीची ही बँक अशा रीतीनें नफ्यांतून दोन लाखांचेवर स्वतःचें फंड निर्माण करून यशस्वी रीतीनें प्रगति करीत आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी



## मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा

+सिंप्लेक्स रु. ४ दि. २८–१–४७.

### साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † बंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २८।१।४७ | बुधवार २९।१।४७ | गुरुवार ३०।१।४७ | शुक्रवार ३१।१।४७ | सोमवार ३।२।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३६१७-८; २५१७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २७०० | २७१५ | २६६५ | २६६५ | २६५२—८ |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४८८—८ | ४८९—८ | ४८२—८ | ४८३—८ | ४८०—८ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३७—८ | ३७—२ | ३६—५ | ३६—२ | ३५—४ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४५-१० | ४५—२ | ४४—८ | ४४—६ | ४३-१४ |
| ३२७७-८; २१३२-८ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | २८७५ | २८९७—८ | २८४७—८ | २८४७—८ | २८४० |
| ११८०; ६५८ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ८८३ | ८९० | ८८९ | ८७४ | ८७२—० |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८३२ | ९१० | ८५० | ८३९ | ८३५—० |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४०२ | ४०४ | ४०० | ४०१—८ | ३९६—०० |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४०२ | ४०४ | ४०० | ४०० | ३९५ |
| ५७१; ३२३ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३६३ | ३६५ | ३५९ | ३५७ | ३५६ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४२४+ | ४३७ | ४२१ | ४२५ | ४२२ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—१—६ | ५—२—३ | ५—१—६ | ५—१—० | ५—०—० |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १९—५ | १९—५ | १९-०-६ | १९—१ | १८—९ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४—२—३ | ४—३—० | ४—२—० | ४—२ | ४—०—० |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८०७—८ | ८१६—४ | ८१०—० | ८१०—० | ७५७—८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २१७—८ | २१८ | २२० | २१९-१२ | २१५-१२ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३१८ | ३१८ | ३१५ | ३०९ | ३०३—० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६३२—८ | ६३८-१२ | ६२५ | ६२२—८ | ६१५ |
| ६०-१० ३६-१२ | ०-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३९-१० | ३९-१५ | ३८—७ | ३८—८ | ३७—३ |

सोमवार दि. ३-२-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बडोदा | १७६ | आंध्र व्हॅली | १६६२-८ | अलकॉक | ६६० |
| सेंट्रल | १३३ | बॉम्बे ट्रॅम | ११९ | न्यू इंडिया | १९-० |
| इंडिया | २५० | टाटा हायड्रो | १९० | शिवराजपुर | ४८-८ |
| इंपी० | २६०० | टाटा पॉवर | १७४० | टाटा केमिकल् | १८-० |
| | ६६० | | | टाटा ऑईल | १८३-८ |
| रिझर्व्ह | १३९ | | | विमको | ६६१-४ |

**कपाशीच्या निर्गतीस परवानगी**—जानेवारी ते एप्रिल, १९४७ या मुदतींत हिंदुस्थान सरकारनें ५ लक्ष गाठी कपास निर्गत होण्यास परवानगी दिली आहे. त्यापैकी अडीच लक्ष गाठी आंखूड धाग्याच्या कपाशीच्या, एक लक्ष गाठी मध्यम धाग्याच्या कपाशीच्या आणि बाकीच्या दीड लक्ष गाठी लांब धाग्याच्या कपाशीच्या आहेत. मे ते ऑगस्ट १९४७ मधील निर्गतबाबत खुलासा मागाहून जाहीर होईल.


**पंजाब नॅशनल बँक लि.**—या बँकेस १९४६ सालीं ५० लक्ष, १९ हजार रु. नफा झाला. २१ लक्ष, ६० हजार रु. करासाठी लागतील. रिझर्व्ह फंड आतां १ कोटि रु. होईल.

**मद्रासमधील दारूबंदी**—मद्रास प्रांतांत सध्या ८ जिल्ह्यांत दारूबंदी आहे. ती आणखी ८ जिल्ह्यांत करण्यांत येईल. म्हणजे, २४ पैकीं १६ जिल्ह्यांत दारूबंदी पुरी होईल.

**झेक बीर येऊं लागणार**—झेकोस्लोव्हाकियांतून हिंदुस्थानाकडे येण्यासाठी बीरच्या दारूचीं बरीचशी खोकीं निघालीं आहेत. युद्धसमाप्तीनंतर ह्यापूर्वी झेक बीर आलेली नव्हती.

### कॅलेंडरांची साभार पोंच

१. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें
२. दि बेंगाल कोल सप्लाइंग फर्म लि.
३. पंढरीनाथ आणि कं. मुंबई
४. सुप्रीम म्युच्युअल इं. ... पु
५. व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि. पुणें.
६. दत्तात्रय नारायण हेजीब, सुक्या मेव्याचे व्यापारी, पुणें.
७. गुडवुईल इन्शुअरन्स कंपनी लि. ( श्री. व्ही. आर. बापटकडून )
८. चित्रशाळा प्रेस, पुणें.
९. दि राजाराम भिशी अँड इंडस्ट्रिज लि. कोल्हापूर
१०. साठे बंधु, पुणें.



... एजंट:—
न्यू दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| अधिकृत व विक्रीस | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ६,७७,३७० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५८,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्यांबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना—१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८२ | "Cencobank" | नं. ११ |

मुख्य कचेरी:—लक्ष्मीरोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर










लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

—यांचे—

**नांगर**

किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली )
किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली )
किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली )

**चरक**

विश्वास ( चार बैली )
वासुदेव ( दोन बैली )
राजा ( एक बैली )

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे [illegible] ले व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) टलीस ३॥ ई [illegible] प्रसिद्ध केलें.